जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७७७ दिनांक - ०१/११/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## चोरीची एक चारचाकी,एक दुचाकी मोटार सायकल व दोन मोबाईल आरोपींकडुन हस्तगत

कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर गुरनं.११०२/२०२३,भादवि कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. वरिष्ठांनी दाखल गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशित केले असता,सदर गुन्हयातील आरोपी युसूफ वजिर शेख हा आश्रफनगर येथे त्याचे राहते घरातील लोकांना भेटीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस अंमलदार, विकास मरगळे व सुहास मोरे यांना प्राप्त झाली होती.

सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,लेखाजी शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक,दिनेश पाटील, तपास पथकातील अंमलदार, अमोल हिरवे, राहुल वंजारी, सुहास मोरे, जयदेव भोसले, राहुल रासगे, अभिजीत रत्नपारखी, अशिष गरुड, रोहित पाटील, राहुल थोरात, शशांक खाडे, विकास मरगळे असे अलीफ टॉवरच्या बाजुला मोकळया मैदानात सोबतच्या पोलीस स्टाफसह सापळा लावुन थांबले असताना,युसुफ शेख हा १८/०० वा.घरातील लोकांना भेटण्यासाठी येणार असलेबाबत बातमीदाराने कळविल्याने,**युसूफ वजिर शेख,वय २३ वर्षे,रा.आश्रनगर,ग.नं.७,न्यु ग्रीन बिल्डींग मध्ये,कोंढवा-खुर्द,पुणे** यास ताब्यात घेवुन,दाखल गुन्हयाबाबत विचारणा केली असता त्याने वरील गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.

त्याचेकडे अधिक चौकशी करता १) कोंढवा पोलीस ठाणे,पुणे गुरनं.११०५/२०२३,भा.दं.वि. कलम ३७९ २) कोंढवा पोलीस ठाणे पुणे गुरनं.१०७७/२०२३,भा.दं.वि.कलम ३७९ ३) कोंढवा पोलीस ठाणे पुणे गुरनं.११०२/२०२३,भादविकलम ३८० प्रमाणे गुन्हे केल्याचे कबुल केले आहे.सदर आरोपी याचेकडुन नमुद दाखल गुन्हयातील चोरी केलेल्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०५,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.शाहुराजे साळवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री.संदिप भोसले, श्री.संजय मोगले यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.


पुणे शहर पोलीस
महाराष्ट्र पोलीस
कोंढवा पोलीस स्टेशन
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६९३०७८०, ०२०-२६१३२०२०
पुणे पोलीस
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर